# प्रेस नोट

## सोनसाखळी जबरी चोरी करणाऱ्यास खंडणी विरोधी पथकाकडून अटक

दि. २०/११/२०१७ रोजी सायं. ०७:०० वा. सुमारास ज्येष्ठ नागरीक सौ. मंदाकिनी विनायक बेडेकर, वय-७० वर्षे, रा: फ्लॅट न. ३/बी, योगेशचंद्र अपार्टमेंट, रामबाग कॉलनी, कोथरुड, पुणे या शतपावली करुन त्यांच्या निवासस्थानी जाण्यासाठी वर नमुद सोसायटीत फिरंत असताना अज्ञात आरोपी यांनी दुचाकी वाहनावरुन येवून वर नमुद महिलेच्या गळ्यातील १८ ग्रॅम वजनाची किं. रु. ५४०००/- ची सोन्याची चेन जबरदस्तीने हिसका मारुन नेली होती. त्याबाबत कोथरुड पो.स्टे. पुणे येथे गु.र.नं. ४३९/१७ भा.दं.वि.क. ३९२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

पुणे शहरात घडणाऱ्या सोनसाखळी जबरी चोरीच्या गुन्ह्याच्या अनुषंगाने मा. पोलीस आयुक्त श्रीमती रश्मी शुक्ला मॅडम यांनी दिलेल्या सुचनेनुसार, सदर गुन्ह्याचा खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव हे त्यांच्या स्टाफसह समांतर तपास करीत असताना, पोलीस निरीक्षक श्री. जांधव यांना त्यांच्या विश्वासू बातमीदाराकडून इसम नामे सफिर फिरोज खान ( इराणी ), रा. विष्णुकृपानगर, शिवाजीनगर, पुणे याने वर नमुद गुन्हा केले बाबत बातमी मिळाली होती. त्यानुसार पो.नि. श्री जाधव यांनी स्टाफसह सदर इसमाचा शोध घेतला असता, सदरचा इसम हा पाटील इस्टेट जवळील कामगार आयुक्त कार्यालयाजवळ रोडवर उभा असलेला मिळून आला. त्यास पकडून त्याच्याकडे चौकशी करता त्याने त्याचे नाव सफिर फिरोज खान, वय-२५ वर्षे, रा. विष्णुकृपानगर, शिवाजीनगर, पुणे असे असल्याचे सांगितले. त्याची दोन पंचा समक्ष अंग झडती घेतली असता त्याच्या पॅन्टच्या खिश्यात किं.रु. ५४,०००/- ची १८ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन जप्त केली आहे. त्याने वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

**वरील कामगिरी ही श्री. प्रदिप देशपांडे सो, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, पुणे श्री. समिर शेख सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १ यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, सहा. पोलीस निरीक्षक विठ्ठल शेलार, सुनिल गवळी व पोलीस स्टाफ अविनाश मराठे, प्रमोद मगर, एकनाथ कंधारे, रमेश गरूड, शिवाजी घुले, हणुमंत गायकवाड, संतोष मते, भाऊसाहेब कोंढरे, एकनाथ शिंदे, धिरज भोर, सुधीर इंगळे, फिरोज बागवान, सचिन अहिवळे, शिवानंद बोले, मंगेश पवार, नारायण बनकर यांनी केलेली आहे.**